कायम विना अनुदान तत्वावर
माध्यमिक शाळा

क्र.शिउसं/माध्य-२/कविअन/नमाशा/परवानगी/२००९-१०/ 1196141737
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.
दिनांक 28/8/08

(23)

प्रति,
शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )
जिल्हा परिषद , नाशिक, धुळे , जळगांव, नंदुरबार

विषय :- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देणेबाबत

---

संदर्भ :- शासनाचे आदेश क्रमांक नमाशा /२००९/~~(१५२/०९)~~ (७७/०८) /माशि-१/
दि. ~~२० जुलै २००९~~ 28/8/08

वरोल विषयाच्या संदर्भिय शासन आदेशान्वये पुढे दिलेल्या संस्थेस नवीन माध्यमिक शाळा सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून सुरु करावयाचे या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदरच्या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर कळविण्या अगोदर संबंधीत संस्थेकडून उपरोक्त ज्ञापन आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेची पडताळणी यारुन, पडताळणी अहवाल परवानगी करीता योग्य त्या सहपत्रासोबत व अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा, म्हणजे पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

(२४/८) स्वाक्षरीत शिक्षण उपसंचालकांनी मान्य केली.

शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग, नाशिक (क)

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- | --- |
| १) | महाराजा सयाजीराव गायकवाड राष्ट्रीय ज्ञान प्रबोधिनी गगनागिरी कॅम्प रोड मालेगाव जि. नाशिक | राजीव गांधी इंटरनॅशनल स्कुल, दाभाडी ता. मालेगाव जि. नाशिक | ८ वी | इंग्रजी |



अंतिम परवानगीसाठी शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जिल्हा परिषद , यांचे मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. त्यासाठी खालील प्रमाणे माहिती सादर करावी.

अ) रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर खालील मुद्दे नमूद करुन अध्यक्ष व सचिव यांच्या सहीचे हमीपत्र आणावे.

१. संस्थेचे नांव
२. माध्यमिक शाळेसाठी परवानगी मिळालेल्या ठिकाणाचे नांव
३. कायम विना अनुदानित तत्वावर शाळा चालविण्यास तयार आहेत अशा आशयाचे वाक्य
४. शासनाचे वेळोवेळी निघणा-या आदेशाचे व माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) विनियम अधिनियम १९८१ चे काटेकोरपणे पालन करण्यात येईल , शाळा प्रवेशाची वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे पालन करण्यात येईल अशा आशयाचे वाक्य
५. शासन निर्णय दिनांक २७ मे २००३ मधील अटी व शर्ती व कार्यपध्दती यांचे पालन करण्यात येईल अशा आशयाचे वाक्य
६. शाळेची परवानगी कायम विना अनुदान असल्याने कोणत्याही प्रकारची अनुदानाची मागणी भविष्यात करता येणार नाही असे वाक्य.
७. इंग्रजी माध्यमाच्या शाळा परवानगी ज्यांना मिळाली आहे. त्यांनी विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे वाक्य , हमी पत्रात नमूद करावे.
८. कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा असा शाळेचा फलक लावलेला आहे. व लेटर हेडवर या आशयाचे वाक्य छापलेले आहे. याचा उल्लेख हमीपत्रात असावा.

ब) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्य अधिनियम १९५० चे प्रमाण पत्राची प्रमाणित छायाप्रत

क) शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तवाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू आहे किंवा नाही याबाबतचा खुलासा दाखविणारे पत्र.

ड) परवानगी अर्जाच्या प्रस्तावासोबत भरलेल्या १०००/५००० रुपयाच्या चलनाची छायांकीत प्रत

इ) संस्थेच्या नांवे बँकेत शिल्लक असलेले रक्कमेचे मुद्याबाबत प्रमाणपत्र

ई ) शाळा सुरु असल्यास वर्गाची पटसंख्या व नेमलेल्या कर्मचाऱ्यांची नांवे व शैक्षणिक पात्रता दर्शविणारी यादी.

Kamlakar Shankar Pawar
Digitally signed by Kamlakar Shankar Pawar
Date: 2021.03.26 13:44:02 +05'30'